सिंधुदुर्ग जिल्हा माध्यमिक उच्च माध्य. शिक्षक व शिक्षकेतर
कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, सिंधुदुर्गनगरी
प्लॉट नं. ३३, सिंधुदुर्ग नगरी
रजि.नं. एसडीजी/(केडीएल) बीएनके/ओ १०३/१९८६-८७ दि. ०१/११/१९८६
फोन - (०२३६२) अध्यक्ष - २२८५९३, कार्यालय – २२८९५३
E-Mail – sindhumadhyamikpatpedi@gmail.com.

जा.क्र. - ३०९/२०१८-१९ दिनांक:२९/०६/२०१८

# परीपत्रक विद्यार्थी पुरस्कार सन २०१८

सर्व सन्मानीय सभासद बंधु भगिनिंनो,

स.न.वि.वि.

आपल्या पतपेढीतर्फे दरवर्षी संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सभासदांच्या मुलांमुलींना पुरस्कार देण्यात येतात. यंदाही फेब्रुवारी /मार्च २०१८ मध्ये झालेल्या एस्.एस्.सी. व एच्.एस्.सी. परीक्षेत (कोणत्याही बोर्डात) उत्तीर्ण होणाऱ्या तसेच इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्तीप्राप्त मुलामुलींच्या गुणपत्रकासह, संबंधीत मुलांच्या पालकांनी १५/०७/२०१८ पर्यंत सोबतच्या नमुन्याप्रमाणे अगर मार्च २०१८ चे अहवालातील पृष्ठ क्र. ६३ वरील नमुन्याप्रमाणे पुरस्कारासाठीचा अर्ज संस्था कार्यालयात पाठवावा. अर्जासोबत गुणपत्रिकेची प्रमाणित झेरॉक्स प्रत व पासपोर्ट आकाराचा फोटो पाठवावा.

पुरस्कार योजना सभासदांच्या पाल्यांसाठी

| शिष्यवृत्ती | रक्कम | एस्.एस्.सी. (१० वी) | रक्कम | एच्.एस्.सी. (१२ वी ) | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| इ.५वी<br>प्रथम क्रमांक<br>द्वितीयक्रमांक<br>तृतीयक्रमांक | <br>रू. १०००.००<br>रू. ७००.००<br>रू. ५००.०० | प्रथम क्रमांक | रू.२०००.०० | विज्ञान शाखा प्रथम क्रमांक<br>द्वितीय क्रमांक<br>तृतीय क्रमांक | रू. २०००.००<br>रू.१५००.००<br>रू. १०००.०० |
| इ.८वी<br>प्रथम क्रमांक<br>द्वितीयक्रमांक<br>तृतीयक्रमांक | <br>रू. १०००.००<br>रू. ७००.००<br>रू. ५००.०० | द्वितीय क्रमांक | रू.१५००.०० | वाणिज्य शाखा प्रथम क्रमांक<br>द्वितीय क्रमांक<br>तृतीय क्रमांक | रू. २०००.००<br>रू. १५००.००<br>रू.१०००.०० |
| | | तृतीय क्रमांक | रू.१०००.०० | कला शाखा प्रथम क्रमांक<br>द्वितीय क्रमांक<br>तृतीय क्रमांक | रू. २०००.००<br>रू. १५००.००<br>रू.१०००.०० |
| | | | | एम्.सी.व्ही.सी. शाखा प्रथम क्रमांक<br>द्वितीय क्रमांक<br>तृतीय क्रमांक | रू. २०००.००<br>रू. १५००.००<br>रू.१०००.०० |

सदरचे पुरस्कार वार्षिक सभेत रोख देण्यात येईल. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना स्वतंत्र कळविण्यात येईल. तरी पाल्यांना सुयश चिंतून यशस्वी होणाऱ्या सर्व मुलांचे अभिनंदन करून पुरस्कार निवडीसाठी योग्य मुदतीत संस्थेकडे अर्ज पाठवावा अशी विनंती.

तसेच गेल्यावर्षीपासून राष्ट्रीय पातळीवर विविध क्रिडा स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या सभासदांच्या पाल्यांना क्रीडा पुरस्कार देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला असून ज्या सभासदांच्या पाल्याने **SGFI (School Game Federation Of India)** अंतर्गत मान्यताप्राप्त खेळांमध्ये राष्ट्रीय स्पर्धेतील पदकप्राप्त (सुवर्णपदक, रौप्यपदक,कास्यपदक ) अशा खेळाडूंना क्रीडा पुरस्कारांतर्गत रोख रक्कम रू.२०००/- व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येते. तरी सभासदांनी सोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे क्रीडा पुरस्कारासाठीचा अर्ज पुर्ण भरून साक्षांकीत क्रीडा प्रमाणपत्रासह ज्यावर स्पष्ट गुणानुक्रम असावा तसेच पाल्याचा पासपोर्ट आकाराच्या फोटोसहीत दि. १०/०७/२०१८ पर्यंत पतपेढीकार्यालयात पोहोचेल असा पाठवावा. नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

श्री. प्रदिप लक्ष्मण प्रभूदेसाई — सेक्रेटरी
श्री.अनंत मोहन सावंत — उपाध्यक्ष
श्री.अनिल बाबुराव गोवेकर — अध्यक्ष

व सर्व संचालक मंडळ
सिंधुदुर्ग जिल्हा माध्यमिक / उच्चमाध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर
कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, सिंधुदुर्गनगरी